ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

# चकविणारे विधेय एक समीक्षा

* डॉ. वेदप्रकाश डोणगावकर ,

* तत्त्वज्ञान विभागप्रमुख, मातोश्री पांताबाई गोटे महाविद्यालय, वाशीम

प्रस्तुत प्रकरण हे डॉ. सुरेंद्र गायधने यांनी १९९९ यावर्षीच्या डिसेंबर महिन्यात लिहिलेल्या 'मूल्य निवेदन : एक अतिनीतिशास्त्रीय चिकित्सा' या पुस्तकातील 'चकविणारे विधेय' या प्रकरण क्रमांक चारवर लिहिलेली समीक्षा आहे. सदर प्रकरणांमध्ये डॉ सुरेंद्र गायधने यांनी गुण, गुणधर्म, संबंध यासारख्या महत्त्वपूर्ण संकल्पनांना अनुसरून 'तुलना संबंध' नावाची एक नवीन संकल्पना निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याला अनुसरून त्यांनी पाश्चात्य विचारवंत विक्टर एफनास्ते यांच्या 'तात्त्विक ज्ञानाची मूलतत्वे' या पुस्तकातून त्यांच्या विचाराचा ही संदर्भ घेतलेला आहे. शेवटी डॉ. गायधने यांनी आपली एक विशिष्ट भूमिका ही मांडलेली आहे. त्याला अनुसरून या प्रकरणामध्ये मी पाच मुद्दयांच्या आधारे त्यांच्या मतांवर समीक्षा अर्थात माझे स्वत:चे मत व्यक्त केले आहे. ते पाच मुद्दे पुढील प्रमाणे :

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited

**मुद्दा क्र. १ :** विक्टर यांच्या मते, ''ज्या गोष्टीमुळे एखादी वस्तू जशी आहे तशी ठरते, ज्या गोष्टीमुळे इतर असंख्य वस्तूंपेक्षा ती वेगळी ठरते, त्या गोष्टी म्हणजे त्या वस्तूचा गुण होय.'' (पृ. ४३)

**समीक्षा :** गुणाच्या आधारे वस्तूचे ज्ञान होऊ शकते. पण गुणामुळे कोणतीतरी एक वस्तू इतर असंख्य वस्तू पेक्षा वेगळी असते किंवा वेगळी ठरते असे मान्य करता येत नाही. कारण काही गुण असे असतात की, ते अनेक वस्तूच्या ठिकाणी समान स्वरूपात दिसून येतात. उदा. 'ठोसपणा' हा जसा लाकडात आहे, तसा तो लोखंडातही आहे. 'लवचिकपणा' हा जसा सोने–चांदी इत्यादी धातूमध्ये आहे, तसा तो प्लास्टिक किंवा रबरामध्येसुद्धा आहे.

**मुद्दा क्र. २ :** विक्टरच्या मते, ''गुणधर्म हा वस्तूचे वैशिष्ट्य फक्त एका बाजूने दाखवतो, तर गुण हा एकूण वस्तूची सर्व साधारण कल्पना देतो'' (उदा. पिवळेपणा, लवचिकता इत्यादी स्वतंत्ररीत्या विचारात घेतल्यास सोन्याचे गुणधर्म ठरतात मात्र हे सर्व एकत्र विचारात घेतल्यास गुण ठरतात.) (पृ. ४३)

**समीक्षा :** वास्तविक पाहता प्रत्येक वस्तूच्या ठिकाणी काही गुण असतातच. (एखाद्या वस्तूच्या ठिकाणी गुण नसणे हा देखील गुणाचाच एक प्रकार आहे.) मात्र गुणाचे 'अस्तित्व' 'अभिव्यक्त' करणे किंवा 'प्रदर्शित' करणे हे पूर्णपणे त्या वस्तूवर अवलंबून नसते. कारण अभिव्यक्त होणे किंवा प्रदर्शित होणे हे त्या गुणाच्या 'स्वभावावर' अवलंबून असते. गुणाच्या या स्वभावालाच 'गुणधर्म' असे मी म्हणतो. मुळात 'वस्तू, वस्तूचा गुण आणि गुणाचा स्वभाव किंवा धर्म' हे इतके एकरूप असतात की त्यात भेद करणे अशक्य होते. मात्र या 'अभेदात' 'भेद' असतो हे मुळीच अमान्य करता येणार नाही. कारण हा भेद मान्य केला नाही तर त्या वस्तूच्या ठिकाणी असलेल्या गुणाला आणि त्या गुणाच्या स्वभावाला किंवा धर्माला मुळीच महत्त्व उरणार नाही.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

किंबहुना ज्या वस्तूत ते 'गुण–धर्म' असतात ती वस्तू इतर वस्तूपेक्षा विशेष आहे हे देखील सिद्ध करण्यास अडचण निर्माण होऊ शकते.

**मुद्दा क्र. ३ :** डॉ. सुरेंद्र गायधने म्हणतात, ''संबंधाची कल्पना करताना एका वस्तूचा त्याच वस्तूशी संबंध आहे अशी कल्पना मला करवत नाही. असे कधीच होऊ शकणार नाही, असे माझे मत आहे.''(पृ. ४५)

**समीक्षा :**

संबंधाची कल्पना करताना, 'एका वस्तूचा त्याच वस्तूशी संबंध असतो', अशी कल्पना करता येते. यासंदर्भात मी, 'अह्म ब्रह्मस्मी' म्हणजे 'मी ब्रह्म आहे.' या महावाक्याचे उदाहरण देतो. याशिवाय ष्प जीपदा जीमतमवितम प उष म्हणजे 'मी विचार करतो म्हणून मी आहे.' हे उदाहरण देखील देऊ इच्छितो. या दोन्ही विधानांमध्ये एका वस्तूचा त्याच वस्तूशी असलेला 'संबंध' सरळ सरळ दिसून येतो. विशेष म्हणजे या दोन्ही विधानातील 'त्या एका वस्तूचा' संबंध तिच्या स्वत:शी, 'सुवर्ण आणि त्यापासून निर्माण झालेले अलंकार' यांच्यात जसा संबंध असतो तसा आहे. यालाच पाश्चात्त्यांच्या भाषेत वस्तू आणि वस्तूचे द्रव्यत्व असे म्हणता येईल.

**मुद्दा क्र. ४ :** डॉ. सुरेंद्र गायधने यांच्या मतानुसार, ''अशी विधाने ज्याविषयी व्यक्तीसापेक्ष सत्यासत्यतेची समस्या उद्‌भवते त्या विधानांचे नामकरण 'चकविणारे विधान' म्हणून करू.'' (पृ. ५०) यासाठी डॉ. गायधने, ''१) ही इमारत उंच आहे. २) ही काठी मोठी आहे. ३) हे हलके आहे.'' ही तीन विधाने उदाहरण म्हणून सादर करतात. या विधानांच्या आधारे डॉ. गायधने म्हणतात की, चकविणाऱ्या विधानांविषयी उपरोक्त उपस्थित होणारी समस्या त्या विधानातील विधेय पदी येणाऱ्या पदामुळे उपस्थित होते असे माझे मत आहे आणि म्हणून अशा विधेयांना 'चकविणारे विधेय' असे मी संबोधणार आहे. डॉ. गायधने यांनी वरील विधानातील 'उंच, मोठी, हलके' यांना चकविणारे विधेय मानले आहे.

पुढे डॉ. गायधने म्हणतात की, ''ज्याप्रमाणे 'पिवळे' या पदाद्वारे गुणधर्म सूचित होतो त्याप्रमाणे 'उंच' ह्या पदाद्वारे कोणताही गुणधर्म सूचित होत नाही.'' (पृ. ५०) कारण त्यांच्या दृष्टिकोनातून, जेव्हा आपण 'एक वस्तू उंच आहे' असे म्हणतो तेव्हा त्या ठिकाणी दुसरी कुठलीतरी ठेंगणी वस्तू असली पाहिजे. कारण त्याशिवाय आपण त्यात तुलना करू शकनार नाही आणि याच आधारे डॉ. सुरेंद्र गायधने संबंध याविषयी 'तुलना संबंध' असाही एक प्रकार सूचविताना दिसतात. मात्र याच संदर्भात ते दोन वस्तूतील संबंधांमध्ये 'गुण किंवा गुणधर्म

संबंध' नसतो असेही मानतात. (पृ. ५१)

**समीक्षा :**

१) डॉ. सुरेंद्र गायधने यांनी विधानातील विधेय पदाच्या संदर्भाने व्यक्तीसापेक्ष सत्यासत्यतेची समस्या उद्‌भवते त्याला चकविणारे विधान मानले आहे. मात्र या संदर्भात मला त्यांना असे सांगावे वाटते की, अशी कितीतरी विधाने आहेत की, त्यासंदर्भातील सत्य–असत्यतेची समस्या कधीही संपुष्टात येत नाही. यासाठी मी त्यांचेच उदाहरण घेतो. 'ही इमारत उंच आहे.' असे म्हणताना जेव्हा आपण एका ठेंगण्या इमारतीचे प्रत्यक्ष करतो, तेव्हाच 'ही इमारत उंच आहे' हे विधान 'सत्य' ठरते. मात्र

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

काही क्षणातच जेव्हा आपण ज्या इमारतीला उंच म्हटले आहे तिच्यापेक्षा दुसऱ्या एका उंच इमारतीला पाहतो तेव्हा 'ही इमारत उंच आहे' हे पहिले विधान 'असत्य' ठरते. वरील मुद्द्याच्या आधारे मला असे म्हणायचे आहे की, विधानांच्या संदर्भाने सत्य किंवा असत्य ही 'अट' किंवा हा 'नियम' लावणे आणि त्या आधारे चकविणाऱ्या विधानाची कल्पना करणे हे फारसे संयुक्तिक वाटत नाही.

२) 'ही इमारत ऊंच आहे.' या विधानाच्या संदर्भाने डॉ. गायधने यांनी 'तुलना संबंध' या विषयी संकेत केले आहेत. मी त्यांच्या या मताशी सहमत आहे की, कुठल्यातरी एखाद्या वस्तूच्या संदर्भात एखादे विधान करीत असताना शक्यतो आपण त्या वस्तूच्या 'कोटीतील' दुसऱ्या एखाद्या वस्तूशी तिची तुलना करतो. अर्थात दोन वस्तूमध्ये तुलना संबंध असू शकतो यात मला शंका नाही.

३) याठिकाणी मी 'तुलना संबंध' या विषयाच्या अनुषंगाने काही नवीन बाबी सुचवू इच्छितो ! अर्थात तुलना संबंधाच्या दृष्टिकोनातून मी, ''दृश्य–अदृश्य किंवा भौतिक व अभौतिक वस्तू वा विषयातील तुलना संबंध'' या विषयाकडे वाचकांचे लक्ष वेधू इच्छितो. माझ्या दृष्टीने 'ही इमारत उंच आहे.' हे विधान दोन दृश्य किंवा दोन भौतिक वस्तु–विषयाच्या तुलनेतून 'अभिव्यक्त' झालेले विधान आहे. अर्थात माझ्या दृष्टीने काही विधान असेही असतात की जे अदृष्य किंवा अभौतिक वस्तू वा विषयाच्या तुलनेतून अभिव्यक्त होत असतात. उदा.'कलियुगात पाप वाढले आहे.' याठिकाणी आपण ऐतिहासिक किंवा पौराणिक दाखल्याच्या आधारे सतयुगाची तुलना कलियुगाशी करतो आणि पापाची तुला पुण्याशी करू लागतो. या विधानातील 'कलियुग' हे उद्देश पद तर 'पाप' हे विधेय पद आहे. डॉ. गायधने म्हणतात त्याप्रमाणे फक्त विधेय पदांमध्ये तुलना संबंध असतो. पण याच विधानातील विधेयाच्या संदर्भाने उद्देशाची देखील तुलना झालेली दिसून येते.

एकंदर केवळ इमारत इत्यादी दृश्य किंवा भौतिक वस्तू–विषयाच्या संदर्भातील विधेय पदामध्ये तुलना संबंध असतो असे नाही तर अदृश्य किंवा भौतिक वस्तू विषयाच्या संदर्भातील विधेय पदामध्ये सुद्धा तुलना संबंध असतो. याहीपेक्षा महत्त्वाचे असे की, जसा विधानातील 'विधेय' पदांमध्ये तुलना संबंध असतो तसा

त्या विधानातील 'उद्देश' पदांमध्ये देखील तुलना संबंध असू शकतो !

४) डॉ. गायधने यांनी, ''जसा 'पिवळे' या पदाद्वारे गुणधर्म सूचित होतो तसा 'उंच' या पदाद्वारे कोणताही गुणधर्म सूचित होत नाही.'' असे म्हटले आहे. (पृ. ५०) मात्र डॉ. गायधने यांचे हे मत मला मान्य नाही. कारण मी 'पिवळे' आणि 'उंच' या दोन्ही पदांना केवळ विधेय पद मानतो आणि प्रत्येक विधेय पद हे 'गुणवाचक' असते असेही मी मानतो. म्हणजे 'ही इमारत उंच आहे.' या विधानातील 'उंच' हे पद 'आकार' या गुणाचे प्रतिनिधित्व करणारे आहे म्हणून या पदाला गुणधर्म सूचक म्हणून स्वीकारावे लागेल.

**मुद्दा क्र. ५ :** डॉ. सुरेंद्र गायधने यांच्या मतानुसार, 'एकाच वस्तूची तुलना त्याच वस्तूशी केली जाऊ शकत नाही.' आपले मत पटवून सांगताना डॉ. गायधने 'तू खूप उंच झाला' हे विधान उदाहरणासाठी घेतात आणि त्याला अनुसरून ते स्वत: म्हणतात की, अशा प्रकारचे विधान करीत असताना आपण विधानातील त्या व्यक्तीची तुलना इतर व्यक्तीशी करण्याऐवजी त्याच व्यक्तीच्या

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

भूतकाळातील उंचीशी करतो. मात्र 'उंची' हे पद गुणवाचक नसल्याने वर्तमानातील 'उंच' व्यक्ती आणि त्याची भूतकाळातली 'उंची' यात तुलना संबंध होऊ शकत नाही असे ही डॉ. गायधने यांना वाटते.

**समीक्षा :** प्रस्तुत लेखातील मुद्दा क्र. ३ मध्ये 'संबंधाची कल्पना' या विषयावर मी 'अह्म ब्रह्मास्मि', 'प जीपदा जीमतमवितम प उ' या विधानांच्या आधारे 'एकाच वस्तूचा, त्याच वस्तूशी संबंध असतो' हे मत मांडले आहे. याशिवाय मी डॉ. गायधने यांच्या 'तुलना संबंध' या संकल्पनेला समर्थन देत मुद्दा क्र. ४ या ठिकाणी त्याचा विस्तार करण्याच्या अनुषंगाने नवीन उदाहरणासह भर घातली आहे. आणि त्यानुसार मी येथे पुन्हा म्हणतो की, केवळ भौतिक वस्तू वा विषयात तुलना संबंध असतो किंवा केवळ विधेय पदांमध्येच तुलना संबंध असतो असे नाही ! तर 'अभौतिक वस्तू वा विषय' तसेच विधानातील विधेय पदासह 'उद्देश पद' यांच्यातही तुलना संबंध होऊ शकतो. तेव्हा 'मी' 'माझ्या' याच मताच्या अनुषंगाने 'वाल्या आणि वाल्मिकी' यांच्यात तुलना करता येते असे मत मांडतो.

एकंदर माझ्या दृष्टीकोनातून, 'तू खूप उंच झाला' हे विधान देखील आपण याच दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. कारण आपल्याकडे भाषेच्या किंबहुना विधानाच्या संदर्भाने विचार करीत असताना केवळ विधेय पदांमध्ये तुलना संबंध असतो असे म्हणणे म्हणजे भाषेतील संकुचितपणा दाखवून दिल्यासारखे होईल.

**संदर्भ :**

१) गायधने (डॉ.) सुरेंद्र, मूल्य निवेदन :एक अतिनीतिशास्त्रीय चिकित्सा, डिसेंबर १९९९ प्रगतिशील साहित्य केंद्र, नागपूर

२) लॉक जॉन, अनु. प्रकाश (डॉ.) श्रीवास्तव, मानवीय बोध, १९८१, राजस्थान हिंदी ग्रंथ अकादमी, जयपुर

**Cite This Article:**

*डॉ. वेदप्रकाश डोणगावकर, (2022 )* चकविणारे विधेय एक समीक्षा**,** ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No. XI (Special Issue-II), 61-64.*